Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
**NAAC Re-accredited A Grade**
Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
Director : (0240) 2403201
Office : (0240) 2403178 / 199
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

**Office : Director, Board of Examination & Evaluation**
**कार्यालय : संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

संदर्भ क्र. परीक्षा/भांडार/२०२३-२४/1638 दिनांक : २७.०३.२०२४

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

विषय : उन्हाळी-२०२४ च्या मार्च/एप्रिल, २०२४ मध्ये आयोजित परीक्षांच्या उत्तरपत्रिका मूल्यांकनाबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल, २०२४ च्या उन्हाळी – २०२४ च्या पहिल्या टप्प्यातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षांना दिनांक ०२ एप्रिल २०२४ पासुन सुरुवात होत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार सर्व अभ्यासक्रमाचे निकाल ३० दिवसांत जाहीर करणे बंधनकारक आहे. तसेच निकाल विहित वेळेत जाहीर करण्यात यावेत असे निर्देश मा. कुलपती कार्यालयाकडून विद्यापीठांना वेळोवेळी प्राप्त होत आहेत. तसेच निकाल वेळेत जाहीर होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत तसेच विद्यार्थ्यांच्या पुढील संधी निकालावर अवलंबून असल्याने यासाठी सर्वच माध्यमातून सहकार्याची व सकारात्मक दृष्टिकोनातून मूल्यांकनाचे कार्य पार पाडण्याची अपेक्षा आहे.

विद्यापीठ प्रशासनामार्फत सर्व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना व प्राचार्यांना वारंवार आवाहन करण्यात येऊनही बरचेशे शिक्षक मूल्यांकन केंद्रावर रुजू होत नसल्याची माहिती विद्यापीठास प्राप्त होत आहे. त्यामुळे याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर व त्यांच्या पुढील भवितव्यावर होत आहे. याच बाबीची गंभीर दखल घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक १५ मार्च २०२४ रोजीच्या बैठकीत या विषयावर सखोल चर्चा झाली. चर्चेअंती आगामी उन्हाळी २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिनांक ०८ एप्रिल २०२४ पासून ज्या विषयाच्या परीक्षा संपतील त्या-त्या विषयाच्या शिक्षकांना त्यांच्या महाविद्यालयातील शिक्षकांना पूर्णवेळ १५ दिवसांकरिता मूल्यांकन केंद्रावर उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी कार्यमूक्त करण्यात यावे, असे निर्देश दिले आहेत.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar *

...२.

तसेच प्राचार्यांनी त्यांच्या महाविद्यालयातील शिक्षकांना मूल्यांकनासाठी कार्यमूक्त केल्यानंतर मूल्यांकन केंद्रांनी शिक्षक कर्मचारी रुजू झाल्याबाबतचा अहवाल त्याच दिवशी विद्यापीठास सादर करावा.

सदरील बाब विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टिने महत्वाची असल्याने याबाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन उत्तरपत्रिका मूल्यांकन पारदर्शीपणे करण्याबाबत सहकार्य करावे.

करिता, सर्व संबंधितांना आवाहन करण्यात येते की, उत्तरपत्रिका मूल्यांकनाची सर्व संलग्नित महाविद्यालये तसेच विद्यापीठाची सामुहिक जबाबदारी व कर्तव्य असल्याने उन्हाळी-२०२४ परीक्षांचे सर्वांच्या सहकार्याने विहित वेळेत मूल्यांकन करण्यात येऊन ३० दिवसांच्या आत निकाल जाहीर करण्यासंबंधी सर्वांनी सामुहिकरित्या सहकार्य करावे, ही विनंती.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar *

आपली,

प्रा. (डॉ.) भारती गवळी
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

याची एक प्रत :

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की, सदरील पत्राची प्रत मा. कुलगुरू महोदयांच्या अवलोकनार्थ सादर करण्यात यावी.

२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की, सदरील पत्राची प्रत मा. प्र-कुलगुरू महोदयांच्या अवलोकनार्थ सादर करण्यात यावी.